जा.क्र./पोउआ/वाह/८५९९ /२०१७

**प्रेसनोट** पुणे, दिनांक - 23 /१०/२०१७

पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी अशोक मोराळे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर, यापुर्वी या ठिकाणी काही पार्कींग निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, साधु वासवानी रोड, पुणे - १ यांचे कार्यालयात दिनांक - 23 / १०/२०१७ ते दिनांक - 06 / ११/२०१७ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचन व हरकती विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

**कोरेगाव पार्क वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

**न्यु जवाहर अपार्टमेंट हौसिंग सोसायटी समोरील रोडच्या डाव्या बाजुस पार्किग करणेत येत आहे.**

<u>प्रेसनोट</u>

दि. २१/१०/२०१७

## पोलीस उप-आयुक्त, वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर

**अंतिम आदेश क्र.** पोउआ/वाहतुक/ ७१ /२०१७

पुणे दि. २३/ १०/२०१७

आदेश,

ज्याअर्थी पुणे शहरातील खालील ठिकाणी वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे चालने इष्ट आहे, त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी अशोक मोराळे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून खालीलप्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करीत आहे. सदर ठिकाणी यापुर्वी पार्कींगबाबत असलेले निर्बंध रद्द समजण्यात येतील.

**विश्रामबाग वाहतूक विभाग पुणे अंतर्गत,**

**शनिवार पेठ ते शनिवार वाडा या मार्गावर पी १, पी २ करणेत येत आहे.**